**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की ,**

माझे नाव – यशवंत विश्वास कदम , वय – ५६ वर्षे,

व्यवसाय – आंबा व्यवसाय

रा. – गढीताम्हाणे, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग

**शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.**

०१. दि.२१/०३/२०२४ रोजी रात्री ११.३० वा. रहाटेश्वर येथील माझ्या बागेत घटना घडली. त्यावेळी मी माझ्या बागेत होतो. त्यावेळी मला विकास चंद्रकांत कदम यांचा रात्री ११.०० वा. फोन आला. त्याने मला सांगितले की, त्यांच्या बागेला कम्पाऊंड करुन घे. मी त्याला सांगितले की, तु तुझ्या भावाकडून करुन घे, मला सांगू नकोस. त्यानंतर मी बागेत झोपलो होतो. आदित्य विकास कदम व विकास चंद्रकात कदम हे रात्री ११.३० वा. च्या दरम्यान माझ्या बागेत आले व त्यांनी मला दांडयाने मारले. तेव्हा मी मारु नका असे ओरडू लागलो. त्यामुळे माझ्या डाव्या पायाला व डाव्या हाताला लागले व मी खाली पडलो. माझ्या बागेला लागून असलेल्या बागेतील ओंकार कदम हा तेथे आला. त्याला पाहून आरोपी निघून गेले. सकाळी मी डॉ.होगले यांच्याकडे गेलो. त्यानंतर मी डॉ. आठवले यांच्याकडे गेलो. तेथे एक्स–रे काढले. त्यांनी मला फ्रॅक्चर आहे असे सांगितले. आरोपींनी मला पोलीस स्टेशनला तक्रार दिली तर ठार मारु अशी धमकी दिली. माझा भाऊ मुंबईला राहतो. मी त्याला फोन केला. तो आल्यानंतर दि.११/०४/२०२४ रोजी मी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन फिर्याद दिली. आता मला ती फिर्यादी दाखवली. ती तोच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. पी१/पी.डब्ल्यू १** देण्यात आहे. त्यानंतर पोलिसांनी मला सरकारी हॉस्पिटल येथे पाठवले. मी दि.१२/०४/२०२४ रोजी सरकारी हॉस्पिटल येथे गेलो. फिर्यादीत मी चुकून २२ तारीख सांगितली होती म्हणून पोलिसांनी माझा पुरवणी जबाब दुसऱ्या दिवशी नोंदवला. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आज ते हजर आहेत.

सरतपास पूर्ण.

**सर्व आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. ए.एम.मागणगावकर यांचे मार्फत.**

०२. आता मला माझ्या फिर्यादीतील **अधोरेखित भाग अ** वाचून दाखवला. तो चुकीचा आहे. मी दुसऱ्या दिवशी गाडीने डॉक्टरांकडे गेलो होतो. मोटारसायकल बागेत होती. मी व ओंकार रात्री मोटारसायकलने बागेत गेलो होतो. मी माझ्या मित्राला फोन करुन चारचाकी गाडी मागवून घेतली. ती गाडी माझ्या बागेमध्ये आली होती. माझा मित्र देवगड मधूनचारचाकी गाडी घेऊन आला होता. त्या

मित्राचे नाव शैलेश रमेश महाडीक असे आहे. शैलेश रमेश महाडीक व माझ्या पत्नीची ओळख आहे. डॉ.होगले यांच्याकडून मी माझ्या घरी गेलो. मी शैलेश सोबत गेलो होतो. डॉ. होगले यांनी मला तपासले होते. मी पोलिसांना डॉ. होगले यांचा वैदयकीय दाखला दिला नव्हता. मी डॉ. होगले यांचा वैदयकीय दाखला घेतला होता. माझ्याकडे डॉ. होगले यांचा वैदयकीय दाखला नाही. डॉ. होगले यांनी मला पायाला लागल्यामुळे हाडांच्या डॉक्टरांकडे जा असे सांगितले होते. मी आठवले डॉक्टरांकडे २९ /३० तारखेला गेलो होतो. डॉ.आठवले यांनी मला तपासून वैदयकीय दाखला दिला होता. तो मी पाहिला होता व समजून घेतला होता. मी डॉ.आठवले यांना माझ्या पायाची जखम पडल्यामुळे झाली असे सांगितले नव्हते. दि.१/०४/२०२४ रोजी मी डॉ. आठवले यांच्याकडे गेलो होतो. दि.१/०४/२०२४ रोजी डॉ. आठवले यांनी मला तपासले असे घडले होते. दि.१/०४/२०२४ नंतर माझे वास्तव्य देवगड येथे होते. १२ तारखेपासून फिर्याद देईपर्यंत मी देवगड येथे वास्तव्यास होतो. २२ तारखेपासून फिर्याद दाखल करेपर्यंत राजेंद्र मनोहर कदम भेटले नव्हते. हे खरे की, माझ्या घरापासून पोलीस स्टेशन एक कि.मी अंतरावर आहे. हे खरे की, डॉ.आठवले यांचा दवाखाना पोलीस स्टेशनपासून ४०० ते ५०० मीटर अंतरावर आहे. मला दांडयाने मारल्याने जखमा झाल्या होत्या असे मी डॉ.आठवले यांना सांगितले होते. डॉ.आठवले यांनी पोलिसांना त्याबाबत कळवले नव्हते. माझा भाऊ रोहीदास विश्वास कदम हा नोकरी निमीत्त मुंबईला असतो. तो काय नोकरी करतो हे मला माहीत नाही. मी ८ एप्रिलला रोहिदास याला घटनेची माहिती दिली होती.

०३. आरोपीचा भाऊ दत्तात्रय याच्याकडून मी बाग करण्यासाठी घेतली आहे असा दाखवणारा करार माझ्याकडे आहे. दत्तात्रय व त्याच्या भावामध्ये वाटप झाल्याचे दाखवणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. दत्तात्रय मुंबईला असतो. आरोपी व त्याचा भाऊ दत्तात्रय यांच्या बागेला अर्धे कुंपण आहे. ज्या बाजूला माझी बाग आरोपीच्या बागेला लागून आहे त्या बाजूला कुंपण आहे. आरोपींच्या बागेला लागून माझी बाग आहे हे दाखवणारा ७/१२ माझ्याकडे आहे. मी पोलिसांना तो दाखवला होता.

०४. हे खरे की, माझ्या वडिलांचे नाव विश्वास काशिराम कदम असे आहे. हे खरे की, आरोपीच्या वडिलांचे नाव चंद्रकांत वसंत कदम असे आहे. आरोपी व आमच्यामध्ये रे.दि.मु.नं.१६६/१९१९ प्रमाणे सुरु झालेला वाद सन २०१७ संपला किंवा कसे हे मला माहीत नाही. माझ्या वडिलांनंतर वारस म्हणून रोहिदास व माझे नाव त्या दाव्यात होते किंवा कसे हे मला माहीत नाही. माझे व रोहिदास चे संबंध चांगले आहेत, आम्ही बोलून चालून आहोत. मी, रोहिदास याला न्यायालयात कशासाठी येतो हे त्याला कधीही विचारले नाही. रोहिदास हा आरोपींच्या विरोधाततील

प्रकरणामध्ये न्यायालयात येत होता हे मला माहीत आहे.

०५. डॉ.पाकळे यांना मी ओळखतो. मी त्यांच्याकडे दि.१४/०४/२०२४ रोजी गेलो होतो. फिर्याद दाखल झाल्यानंतर मी डॉ.पाकळे यांच्याकडे गेलो होतो. मी डॉ.पाकळे यांच्याकडे जाण्यापुर्वी डॉ. आठवले यांच्याकडे पायाला फ्रॅक्चर केले होते. फिर्याद दिल्यानंतर सरकारी हॉस्पिटलमध्ये जेव्हा मला पाठवले तेव्हा त्यांनी दुसऱ्या डॉक्टरांकडे जाण्यास सांगितले.

०६. आरोपीने मारल्यावर मी खाली पडलो असे मी फिर्याद देताना पोलिसांना सांगितले होती. ही बाब माझ्या फिर्यादीत का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी रात्र झाली होती म्हणून मी माझ्या पत्नीला अथवा भावाला घटनेबाबत फोन करुन कळवले नाही. हे खरे नाही की, सकाळी मी कुटुंबियांना घटनेबाबत कळवले नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मी कळवले नाही.

०७. हे खरे नाही की, आरोपींनी मला दांडयाने मारले व त्यामुळे मला जखमा झाल्या हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, आरोपी व माझ्यामध्ये असलेल्या वादातून मी त्यांच्याविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे खरे नाही की, मला अन्य ठिकाणी झालेल्या जखमांचा गैरफायदा घेऊन मी खोटी फिर्याद दाखल केली. हे खरे नाही की, आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

(श्रीमती एन.बी.घाटगे)
न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड

दि. १२/०३/२०२५